आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२३ नोव्हेंबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीच्या कलांमध्ये महायुतीची दणदणीत आघाडी
- भाजपा १२६, शिवसेना ५५, राष्ट्रवादी काँग्रेस ४० जागांवर पुढे
- महाविकास आघाडीला मोठा फटका, आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार काँग्रेस १९, उद्धव ठाकरे १८ आणि शरद पवारांचा पक्ष १२ जागांवर पुढ

**आणि**

- झारखंड विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा सर्वात मोठा पक्ष

**<><><><><>**

सध्या हाती आलेल्या कलांनुसार राज्य विधानसभा निवडणुकीत महायुती आघाडीवर असल्याचं दिसतंय. महायुतीतले प्रमुख घटक पक्ष आतापर्यंत २२२ जागांवर आघाडीवर आहेत. त्यात भाजपा १२६, शिवसेना ५६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस ३९ जागांवर पुढे आहे.

तर महाविकास आघाडीतले प्रमुख घटक ४९ जागांवर आघाडीवर आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १९, काँग्रेस १८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १२ जागांवर पुढे आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या लाडक्या बहिणी, भाऊ आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मतदान करून महायुतीला निवडून दिलं असून समाजातल्या सर्व घटकांनी महायुतीच्या कामाची पोचपावती दिली आहे, त्यामुळे सर्व मतदारांचं मनापासून अभिनंदन करत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

**बाईट : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

विधानसभा निकालामध्ये महायुतीनं मुसंडी मारली असून हा विजय साजरा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानाबाहेर शिवसेना कार्यकर्त्यांचा जल्लोष सुरु आहे.

महायुतीची विजयी घोडदौड सुरु असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘ एक है तो ‘सेफ’ है ! मोदी है तो मुमकिन हैं ! अशा शब्दांत आपल्या समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया दिली आहे. महाराष्ट्रानं गुलाबी रंगाला निवडलं अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या जनतेनं महायुतीला भरघोस मतं दिल्याबद्दल भाजपाचे नेते प्रवीण दरेकर यांनी जनतेचे आभार मानले आहेत. या विजयात राज्यातल्या महिलांचा मोठा वाटा असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्या पक्षाला बहुमत मिळतं त्या पक्षाचा नेता सर्वसाधारणपणे मुख्यमंत्री होतो, सर्वाधिक जागा भाजपाला मिळाल्या आहेत, त्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होतील असं वाटत आहे, मात्र महायुतीच्या पक्षांमध्ये विचारविनिमय करून मुख्यमंत्रीपदाचा निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले.

दरम्यान या आघाडीबद्दल फडणवीस यांच्या मातोश्रींनीही त्यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

**विदर्भातल्या महत्त्वाच्या लढतींचा विचार करता**

**बल्लारपूरमध्ये** मतमोजणीच्या चौथ्या फेरीअखेर **भाजपाचे सुधीर मुनगंटीवार** आघाडीवर आहेत. **ब्रह्मपुरी**त मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर काँग्रेसचे विजय

वडेट्टीवार त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी **भाजपाचे कृष्णलाल सहारे** यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**अहेरी**त मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेसचे धर्मराव अत्राम** आघाडीवर आहेत. त्यांची मुलगी आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या भाग्यश्री आत्राम या पिछाडीवर आहेत.

**दिग्रस**मध्ये मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **शिवसेनेचे संजय राठोड** त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे माणिकराव ठाकरे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

**मुंबई आणि कोकणातल्या महत्त्वाच्या लढती पाहता**

**जोगेश्वरी पूर्व** मतमोजणीच्या दहाव्या फेरीअखेर **शिवसेनेच्या मनिषा वायकर** आघाडीवर आहेत. **दिंडोशी**मध्ये मतमोजणीच्या सहाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे संजय निरुपम** आघाडीवर आहेत. **मालाड पश्चिममध्ये** मतमोजणीच्या दहाव्या फेरीअखेर भाजपाचे विनोद शेलार त्यांचे प्रतिस्पर्धी **काँग्रेसचे अस्लम शेख** यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**घाटकोपर पश्चिम**मध्ये मतमोजणीच्या आठव्या फेरीअखेर **भाजपाचे राम कदम** आघाडीवर आहेत. **मानखुर्द शिवाजीनगर**मध्ये मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर **समाजवादी पक्षाचे अबु आझमी** आघाडीवर आहेत.

**अणुशक्तीनगरमध्ये** मतमोजणीच्या सतराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे फहाद अहमद** आघाडीवर आहेत. **वांद्रे पूर्वमध्ये** मतमोजणीच्या अकराव्या फेरीअखेर **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वरुण सरदेसाई** आघाडीवर आहेत. **वांद्रे पश्चिममध्ये** मतमोजणीच्या नवव्या फेरीअखेर **भाजपाचे आशिष शेलार** आघाडीवर आहेत.

**दापोलीमध्ये** मतमोजणीच्या चोविसाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>योगेश कदम</u>** आघाडीवर आहेत. **गुहागरमध्ये** मतमोजणीच्या बाविसाव्या फेरीअखेर **शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे** **<u>भास्कर जाधव</u>** आघाडीवर आहेत. **रत्नागिरीमध्ये** मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>उदय सामंत</u>** आघाडीवर आहेत. त्यांचे बंधू **राजापूरमध्ये** मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>किरण सामंत</u>** आघाडीवर आहेत.

**कणकवलीमध्ये** मतमोजणीच्या अठराव्या फेरीअखेर **भाजपचे** **<u>नितेश राणे</u>** आघाडीवर आहेत. **कुडाळमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>निलेश राणे</u>** आघाडीवर आहेत. **सावंतवाडीमध्ये** मतमोजणीच्या पंधराव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>दिपक केसरकर</u>** आघाडीवर आहेत.

**श्रीवर्धनमध्ये** मतमोजणीच्या चोविसाव्या फेरीअखेर आलेले आकडे पाहता **राष्ट्रवादी काँग्रेसच्या** **<u>अदिती तटकरे</u>** यांचा विजय जवळपास निश्चित झाला आहे. **महाडमध्ये** मतमोजणीच्या पंचविसाव्या फेरीअखेर **शिवसेनेचे** **<u>भरत गोगावले</u>** आघाडीवर आहेत.

**पश्चिम महाराष्ट्रतली परिस्थिती जाणून घेऊया**

**संगमनेरमध्ये** मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर **शिवसेनेच्या** **<u>अमोल खताळ</u>** आघाडीवर आहेत. **शिर्डीमध्ये** मतमोजणीच्या एकोणिसाव्या फेरीअखेर **भाजपाचे** **<u>राधाकृष्ण विखे पाटील</u>** यांचा विजय निश्चित झाला आहे. **श्रीरामपूर** मतदार संघात मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर **काँग्रेसचे** **<u>हेमंत ओगले</u>** आघाडीवर आहेत. **कर्जत जामखेडमध्ये** मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे** **<u>रोहित पवार</u>** आघाडीवर आहेत.

**कागलमध्ये** मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेसचे** **<u>हसन मुश्रीफ</u>** आघाडीवर आहेत. **कोल्हापूर उत्तरमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर

**शिवसेनेचे <u>राजेश क्षीरसागर</u>** आघाडीवर आहेत. **शाहुवाडी**मध्ये मतमोजणीच्या सतराव्या फेरीअखेर **जनसुराज्य पक्षाचे <u>विनय कोरे</u>** आघाडीवर आहेत.

**इस्लामपूरमध्ये** मतमोजणीच्या विसाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे <u>जयंत पाटील</u>** यांचा विजय निश्चित झाला आहे. **पलूस- कडेगावमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस चे <u>विश्वजीत कदम</u>** आघाडीवर आहेत.

**तासगाव- कवठेमहांकाळमध्ये** मतमोजणीच्या चौदाव्या फेरीअखेर **राष्ट्रवादी काँग्रेस शरदच्चंद्र पवार पक्षाचे <u>रोहित पाटील</u>** आघाडीवर आहेत.

जतमध्ये मतमोजणीच्या तेराव्या फेरीअखेर **भाजपाचे <u>गोपिचंद पडळकर</u>** आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे जिवा गावीत कळवणमधून, तर विनोद निकोले डहाणूमधून आघाडीवर आहेत. समाजवादी पक्षाचे रईस शेख भिवंडी पूर्वमधून तर अबू आझमी मानखुर्द-शिवाजीनगरमधून आघाडीवर आहेत. जनसुराज्य पक्षाचे अशोक माने हातकणंगल्यातून, तर राजर्षी शाहू विकास आघाडीचे राजेंद्र पाटील याड्रावकर शिरोळमधून पुढे आहेत. राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा यांनी बडनेरातून पुढे आहेत. आझाद समाज पक्ष (कांशीराम)चे अलीम वहीद यांनी अमरावतीतून आघाडीवर आहेत. शेतकरी कामगारे पक्षाचे बाबासाहेब देशमुख सांगोला मतदारसंघातून, राष्ट्रीय समाज पक्षाचे रत्नाकर गुट्टे गंगाखेडमधून, एमआयएमचे इम्तियाज जलील औरंगाबाद पूर्वमधून, इंडियन सेक्युलर लार्जेस्ट असेंब्ली ऑफ महाराष्ट्रचे आसिफ रशीद यांनी मालेगाव मध्यमधून आघाडी घेतली आहे.

**<><><><><>**

राज्यात आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार ४ जागांवर अपक्ष आघाडीवर आहेत. नवापुरातून शरद गावित, जुन्नरमधून शरद सोनवणे, शेवगावमधून चंद्रशेखर घुले पाटील, आणि चंदगडमधून शिवाजी पाटील सध्या आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

झारखंड विधानसभा निवडणुकीची मतमोजणी देखील आज होत आहे. सर्व ८१ मतदार संघांचे कल हाती आले आहेत. आतापर्यंत हाती आलेल्या कलांनुसार झारखंड मुक्ती मोर्चा ३१, भाजपा २६, काँग्रेस १४, राष्ट्रीय जनता दल ४, माकपा मार्क्सिस्ट लेनिनिस्ट २, AJSUP १, लोकजनशक्ती रामविलास पक्ष, संयुक्त जनता दल आणि अपक्ष प्रत्येकी एका जागेवर आघाडीवर आहे.

**<><><><><>**

देशात आज लोकसभेच्या २ जागांवर पोटनिवडणूक होते आहे. केरळमधल्या वायनाडमध्ये काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी आणि नांदेडमध्ये भाजपाचे संतुकराव हंबर्डे आघाडीवर आहेत. याशिवाय विविध राज्यातल्या एकूण ४८ मतदारसंघातही विधानसभेची पोटनिवडणूक होते आहेत.

**<><><><><>**

**उत्तर महाराष्ट्रातले प्रमुख मतदारसंघ आता पाहुया**

**अक्कलकुवा** मतदार संघात मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर काँग्रेसचे के सी पाडवी अपक्ष उमेदवार डॉ हीना गावित यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**नंदुरबार** मतदार संघात मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर भाजपाचे विजयकुमार गावित काँग्रेसचे किरण तडवी यांच्या पेक्षा ४० हजार २९३ मतांनी आघाडीवर आहेत.

**धुळे शहर मतदार संघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीअखेर भाजपाचे अनुप अगरवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल गोटे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.**

**शिंदखेडा मध्ये** मतमोजणीच्या बाराव्या फेरीअखेर भाजपाचे जयकुमार रावल आघाडीवर आहेत.

**जळगाव ग्रामीण** मतदार संघात शिवसेनेचे उमेदवार गुलाबराव पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गुलाबराव देवकर यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**जामनेर** मतदार संघात मतमोजणीच्या सोळाव्या फेरीअखेर भाजपाचे गिरीश महाजन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दिलीप खोडपे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**सिंदखेडराजा** मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोज कायंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेंद्र शिंगणे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**मुक्ताईनगर** मतदार संघात मतमोजणीच्या शिवसेनेचे चंद्रकांत निंबा पाटील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार रोहिणी खडसे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**बडनेरा** मतदार संघात मतमोजणीच्या चौथ्या फेरीअखेर राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा आघाडीवर आहेत.

**तिवसा** मतदार संघात मतमोजणीच्या आठव्या फेरीअखेर भाजपाचे राजेश वानखेडे काँग्रेसच्या यशोमती ठाकूर यांच्या पेक्षा ५ हजार ९७३मतांनी आघाडीवर आहेत.

**अचलपूर** मतदार संघात मतमोजणीच्या सातव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार प्रवीण तायडे त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार अनिरुद्ध देशमुख यांच्या पेक्षा ११ हजार ८५० मतांनी आघाडीवर आहेत.

**काटोल** मतदार संघात मतमोजणीच्या फेरीअखेर भाजपाचे चरणसिंग ठाकूर त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सलील देशमुख यांच्या पेक्षा ९ हजार ७५९ मतांनी आघाडीवर आहेत.

**नागपूर दक्षिण पश्चिम** मतदार संघात मतमोजणीच्या आठव्या फेरीअखेर भाजपाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस आघाडीवर आहेत.

**नागपूर उत्तर** मतदार संघात मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीअखेर काँग्रेसचे नितिन राऊत भाजपाचे मिलिंद माने यांच्या पेक्षा ५५ मतांनी आघाडीवर आहेत.

**कामठी** मतदार संघात मतमोजणीच्या नवव्या फेरीअखेर काँग्रेसचे उमेदवार सुरेश भोयर भाजपाचे चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पेक्षा ३ हजार १४४ मतांनी आघाडीवर आहेत.

**साकोली** मतदार संघात काँग्रेसचे नाना पटोले आणि भाजपाचे अविनाश ब्राह्मणकर यांच्यात चुरस दिसून येत आहे.

**माहीम** मतदार संघात मतमोजणीच्या चौथ्या फेरीअखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महेश सावंत त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी शिवसेनेचे सदा सरवणकर यांच्या पेक्षा ७ हजार ४८० मतांनी आघाडीवर आहेत.

**वरळी** मतदार संघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आदित्य ठाकरे मतमोजणीच्या दहाव्या फेरीअखेर शिवसेनेचे मिलिंद देवरा यांच्यापेक्षा आघाडीवर आहेत.

**कुलाबा** मतदार संघात मतमोजणीच्या अकराव्या फेरीअखेर भाजपाचे राहुल नार्वेकर त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे हिरा देवासी यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत.

**धारावी मधून** तेराव्या फेरीअखेर काँग्रेसच्या ज्योती गायकवाड शिवसेनेचे राजेश खंदारे यांच्या पेक्षा आघाडीवर आहेत

**मलबार हिल** मधून अकराव्या फेरीअखेर भाजपाचे मंगल प्रभात लोढा ३६ हजार ३६२ मतांनी आघाडीवर आहेत

**मुंबादेवी** मतदारसंघातून काँग्रेसचे अमिन पटेल शिवसेनेच्या शायना एन सी यांच्या पेक्षा १२ हजार ७५५ मतांनी आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

भाजपा उमेदवार आघाडीवर असलेले मतदारसंघ आता पाहुया

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अचलपूर | ऐरोली | अक्कलकोट | अक्कलकोट पूर्व | अकोट |
| आमगाव | अर्णी | आर्वी | अष्टी | औसा |
| बदनापूर | बागलाण | बल्लारपूर | बेलापूर | भिवंडी पश्चिम |
| भोकर | , भोकरदन | , भोसरी, | भुसावळ, | बोरीवली, |
| चाळीसगाव, | चंद्रपूर | ,चांदवड, | चारकोप, | चिखली, |
| या मतदारसंघात भाजपाचे उमेदवार आघाडीवर आहेत. | | | | |
| चिमूर, | चिंचवड, | कुलाबा, | दहिसर | ,दौंड, |
| देगलूर, | देवळी, | धामणगाव रेल्वे, | धुळे शहर, | धुळे ग्रामीण |
| डोंबिवली, , | गडचिरोली, | घाटकोपर पूर्व, | गोंदिया, | गोरेगाव |
| हिंगणघाट, | हिंगणा, | हिंगोली, | इचलकरंजी, | जळगाव (जामोद) |
| जळगाव शहर, | जामनेर, | जत, | कैज | कलिना |
| या मतदारसंघातही भाजपाच्या उमेदवारांना मतदारांनी कौल दिला आहे. | | | | |
| कल्याण पूर्व, | कांदिवली पूर्व, | कणकवली, | कऱ्हाड उत्तर, | कऱ्हाड दक्षिण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| करंजा, , | कसबा पेठ, | काटोल, | खडकवासला , | खामगाव |
| कोल्हापूर दक्षिण, , | कोथरूड | ,लातूर ग्रामीण | ,मलबार हिल, | मालाड पश्चिम |
| माळशिरस, | माण | ,मेळघाट, | मीरा भाईंदर, | मिरज |
| मोर्शी, | मुखेड, | मुलुंड, | मुरबाड, | मुर्तीजापूर |
| नागपूर सेंट्रल, | नागपूर पूर्व, | नागपूर उत्तर | नागपूर दक्षिण | नागपूरदक्षिण पश्चिम |
| हे मतदारसंघही भाजप उमेदवार जिंकतील अशी शक्यता आहे. | | | | |
| नायगाव | नालासोपारा | नंदुरबार | नाशिक मध्य | नाशिक पूर्व |
| नाशिक पश्चिम | निलंगा | पनवेल | परतूर | पर्वती |
| पेण | फुलंब्री | पूणे कॉँन्टोन्मेंट | राहुरी | राळेगण |
| रावेर | सकोली | सांगली | सातारा | सावनेर |
| या मतदारसंघातल्या मतदारांचा कौलही भाजपाच्या बाजूने आहे. | | | | |

//<><><><><>//